नियमीत फौ. ख. क्र. ८६/२०२५
सरकार -वि.- अभय व इतर
नि.क्र. २९.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - वासुदेव परसराम समर्थ,
वय ३५ वर्षे, व्यवसाय – पो.शि.ब.क्र.२२७९
राहणार – पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>

१. मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. दिनांक ०५.०४.२०२५ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. मी त्यादिवशी सहाय्यक फौजदार भगवानदास यादव यांच्यासह कारगाव बिट परिसरात पेट्रोलींग करीत असताना दुपारी १२.०० वा. कारगाव कऱ्हांडला कच्च्या रस्त्यावर एक टिप्पर येताना दिसला. त्याला आम्ही थांबविले त्याची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळून आली. चालकाला परवाना बाबत विचारणा केली असता परवाना नव्हता. त्या टिप्परचा क्र. एम.एच.३५-ए.जे.३१०६ असा होता. त्यानंतर मी दोन पंचाना समन्स दिला. आता मला दाखविलेला नि.क्र.१९ वरील समन्स तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर मी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला नि.क्र.२० वरील घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर ट्रक घेऊन मी पोलीस स्टेशनला आलो व फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येते.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी कारगाव येथे पेट्रोलींग करीत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी केसेसचा टार्गेट पुर्ण करण्यासाठी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १८.०४.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.